# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : dtedesk2a@gmail.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


तात्काळ/महत्वाचे

क्रमांक: २अ/एडीएम/प्रवेश/२०१६/ ९९२९

दिनांक : 19 DEC 2016

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत भाषिक अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेशाबाबत..

संदर्भ : शासन पत्र क्र : संकीर्ण-२०१६/प्र.क्र-५७६/तांशि-४, दिनांक २८/११/२०१६

उपरोक्त विषयासंदर्भाधिन शासन पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता या संचालनालयाच्या नियंत्रणाखालील ज्या भाषिक अल्पसंख्यांक संस्थेतील व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात आलेला आहे. अशा सर्व संस्थेतील भाषिक अल्पसंख्यांक कोटयाअंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यात (School Leaving Certificate) व विदयार्थ्याने सादर केलेल्या शपथपत्रामध्ये वेगळीच मातृभाषा नमूद असल्याने अशा अल्पसंख्यांक विदयार्थ्यांच्या बाबतीत भाषिक अल्पसंख्याक म्हणुन ग्राहय धरण्यावरुन संभ्रम निर्माण झाले असल्यास अशा प्रकरणी संबधित विदयार्थ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी व त्यांच्याकडून लेखी खुलासा प्राप्त करुन घ्यावा. विदयार्थ्यांनी खुलाशात सादर केलेल्या माहितीस / वस्तुस्थितीस अनुसरुन पुढील कार्यवाहीसाठी या संचालनालयास प्रस्ताव आपल्या अभिप्रायासह तात्काळ सादर करण्यात यावा जेणेकरुन संदर्भाधिन शासन पत्रानुसार उचित निर्णय घेणे या संचालनालयास सुलभ होईल.

(दयानंद मेश्राम)

सहसंचालक

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबइ

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2016/ ३५१२

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर

दिनांक:- 21 DEC 2016

प्रति,

प्राचार्य,

सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम,

नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार भाषिक अल्पसंख्यांक कोटयाअंतर्गत प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या शाळा सोडलेल्या दाखल्यात व शपथपत्रात तफावत आढळल्यास वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर